# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ७१-७९

( विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका )

दिनांक : ८ मार्च ते १३ एप्रिल २०१६

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| ७१ | ८ मार्च | सह्याद्री |
| ७२ | १० मार्च | विधानभवन |
| ७३ | १७ मार्च | विधानभवन |
| ७४ | १८ मार्च | विधानभवन |
| ७५ | २३ मार्च | विधानभवन |
| ७६ | २९ मार्च | विधानभवन |
| ७७ | ३१ मार्च | विधानभवन |
| ७८ | ६ एप्रिल | विधानभवन |
| ७९ | ११ एप्रिल | विधानभवन |

दि. ८ मार्च, २०१६
पर्यटन विभाग

## पर्यटन संचालनालयाची निर्मिती करण्याचा निर्णय

शासनाच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी राज्यामध्ये पर्यटन संचालनालय निर्माण करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे संचालनालय पर्यटन विकास, प्रसिद्धी, पणन आदी बाबींसंदर्भात कार्य करेल. तसेच पर्यटन क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ करण्याबरोबरच रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या प्रशिक्षणाच्या योजना राबविण्याचे कामही या संचालनालयामार्फत केले जाणार आहे.

या पर्यटन संचालनालयाचे प्रमुख म्हणून संचालक (पर्यटन) हे काम पाहणार आहेत. त्यांच्या अंतर्गत पाच प्रादेशिक कार्यालये राहणार असून त्यांचे प्रमुख म्हणून उपसंचालक (पर्यटन) हे काम पाहतील. ही प्रादेशिक कार्यालये नागपूर, औरंगाबाद, अमरावती, सिंधुदुर्ग व पुणे येथे असतील. या पर्यटन संचालनालयासाठी आणि त्यांच्या प्रादेशिक कार्यालयासाठी नवीन पदे निर्माण करण्यास तसेच साधनसामग्री खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या पदाचे सेवा प्रवेश नियम एक वर्षाच्या कालावधीत तयार करण्यात येणार आहेत. पर्यटन संचालनालयासाठी जागाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

-----o-----

दि. ८ मार्च, २०१६
पर्यटन विभाग

## राज्याचे -पर्यटन धोरण २०१६ ला मान्यता

आर्थिक विकासाला चालना देण्याची आणि मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटन धोरण २०१६ ची अंमलबजावणी दि. १ एप्रिल २०१६ पासून सुरू करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार पात्र घटकांना विविध सवलती आणि प्रोत्साहने देण्यात येणार आहेत.

नवीन पर्यटन धोरणानुसार पर्यटनवृद्धीसाठी ध्येय निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये लोकप्रिय व कायमस्वरुपी पर्यटनाचे ठिकाण म्हणून राज्याचा विकास करणे तसेच जागतिक, प्रादेशिक व स्थानिक चालीरीती व आदर्श यांचा व्यापक अनुभव आणून देण्यास प्रोत्साहन देणे आणि सर्व सामाजिक, आर्थिक व भौगोलिक क्षेत्रांना समान संधी उपलब्ध करून देण्यासह ही क्षेत्रे पर्यटनाच्या दृष्टीने सुसाध्य करणे यांचा समावेश आहे. पर्यटन व पर्यटनाशी संबंधित कार्यक्रमांतून दरवर्षी या क्षेत्रात १० टक्के वाढ आणि राज्याच्या स्थूल उत्पादनात १५ टक्के हिस्सा साध्य करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे.

या धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये पर्यटन क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, खाजगी-सार्वजनिक-भागीदारी पद्धतीने चालविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा वेग वाढविणे, पर्यटन क्षेत्रातील गुंतवणूक जागतिक गुंतवणूकदार समुहापर्यंत पोहोचविणे, पर्यटन विषयक पायाभूत विकासाची निर्मिती करणे, पर्यटनविषयक उद्योगधंदे व अशा उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठीचे अभिनव उपक्रम

विकसित करणे, पर्यटनस्थळे व पथमार्ग यांचा विकास करणे आणि पर्यटन विकासासंबंधी कायमस्वरुपी दृष्टिकोन स्वीकारणे यांचा समावेश आहे.

या धोरणांतर्गत पात्र पर्यटक घटकांना क्षेत्रनिहाय ऐषआराम करातून सूट (Luxury tax), क्षेत्रनिहाय करमणूक किंवा मनोरंजन करातून सूट (Entertainment tax), क्षेत्रनिहाय मुद्रांक शुल्कातून सूट, संबंधित कालावधितील वीज शुल्काची आकारणी औद्योगिक दराने करणे आदी सवलती देण्यात येणार आहेत. तसेच सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर या पर्यटन जिल्ह्यासाठी व अन्य क्षेत्रांसाठी पर्यटन क्षेत्र म्हणून १० वर्षांसाठी विशेष कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे.

-----o-----

दि. ८ मार्च, २०१६

नगर विकास विभाग

**जेएनएनयुआरएम अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत मंजूर प्रकल्पांना १८० कोटींचा निधी देण्याचा निर्णय**

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्यांसंदर्भातील सुधारित वित्तीय आकृतीबंधानुसार राज्य हिश्शाचे आवश्यक असणारे १८० कोटी इतके वाढीव अनुदान देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या केंद्र व राज्य हिश्शाच्या वित्तीय आकृतीबंधामध्ये बदल केला आहे. त्यामुळे केंद्र हिश्श्याची रक्कम ८० टक्के वरून ६० टक्के झाली आहे. त्याठिकाणी सुधारित वित्तीय आकृतिबंध हा ६० (केंद्र) : २० (राज्य) : २० (नागरी स्वराज्य संस्था) असा निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर निर्माण झालेला आर्थिक भार कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या सूचनेनुसार वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या अभियानांतर्गत २०१२-१४ या कालावधीमध्ये ट्रांझिशन फेज अंतर्गत नागरी पायाभूत सुविधा आणि लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सुविधांचा विकास या उपअभियानांतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधाविषयक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांना आता केंद्र शासनाकडून नव्याने घोषित झालेल्या अटल मिशन फॉर रिज्युव्हिनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) अभियानांतर्गत निधीचे वितरण होणार आहे.

------o------

दि. १० मार्च २०१६
नगरविकास विभाग

**महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या**
**मसुद्यास मंत्रिमंडळाची मान्यता**

राज्यातील महानगरांचा जलद आणि शिस्तबद्ध विकास व्हावा तसेच महानगर प्रदेशातील महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे योजना किंवा प्रकल्प राबवताना त्यात सुसूत्रता रहावी यासाठी संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास संवैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या मसुद्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या मसुद्यानुसार अधिनियम करण्यासाठी विधानमंडळासमोर विधेयक सादर करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

महानगर प्रदेश क्षेत्रामधील नागरिकांना सोयी सुविधा पुरविताना तसेच पायाभूत सुविधांची निर्मिती करताना किंवा त्यासाठी विविध योजना व प्रकल्प राबवताना विविध नियोजन प्राधिकारी संस्था तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये समन्वय आवश्यक असतो. त्याअनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर वेगवेगळ्या महानगर प्रदेशांसाठी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची निर्मिती प्रस्तावित आहे. या प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर त्यास संविधनिक दर्जा देण्यासाठी प्रस्तावित अधिनियमाच्या मसुद्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

दि. १० मार्च २०१६
सहकार विभाग

शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे ऊस दर मिळण्यासाठी

**खांडसरी कारखान्यांना साखर उद्योगाप्रमाणे**
**व्याज अनुदान देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय**

साखर उद्योगाप्रमाणे खांडसरी उद्योगाला एफ.आर.पी. देणे बंधनकारक नसले तरी स्पर्धेत टिकण्यासाठी साखर कारखान्यांच्या बरोबरीने या उद्योगासही ऊस दर द्यावा लागतो. परंतु साखर कारखान्यांप्रमाणेच खांडसरी उद्योगासही एफ.आर.पी. किंमत देणे अवघड झाले असल्याने खांडसरी कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना एफ.आर.पीची रक्कम साखर कारखान्यांप्रमाणे अदा करण्यासाठी व्याज अनुदान देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

शेतकऱ्यांना २०१४-१५ च्या गाळप हंगामात ऊस दराची ८० टक्के रक्कम जवळच्या ऊस कारखान्याला लागू असलेल्या एफ.आर.पी दराप्रमाणे देणाऱ्या खांडसरी प्रकल्पांना सॉफ्ट लोन योजनेचा लाभ घेता येईल. तसेच यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आल्यानंतर बँकांमार्फत ३० एप्रिल २०१६ पर्यंत वितरित आणि मंजूर करण्यात आलेल्या कर्जाला व्याज अनुदानास सवलत लागू असेल. या कारखान्यांना देय असलेल्या कर्जापोटीचे ५ वर्षांचे अनुदान म्हणून एकूण २९८.०४ लाख इतक्या निधीस मान्यता देण्यात आली.

-----०-----

दि. १० मार्च २०१६
नगर विकास विभाग

## नागरी भागातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठीच्या प्रस्तावित धोरणास मान्यता

नागरी भागातील अनधिकृत बांधकामांवर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाबरोबरच इतर संबंधित अधिनियमामध्ये दुरुस्ती करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्याच्या नागरी क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करणे तसेच अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करता येतील किंवा कसे? यासंबंधी नेमण्यात आलेल्या समितीने सूचविलेल्या पर्यायांनुसार अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत स्वतंत्र अधिनियम न करता तसेच अशी अनधिकृत बांधकामे सरसकट नियमित न करता प्रस्तावित मार्गदर्शक निकषामध्ये बसतील तेवढीच बांधकामे प्रशमन शुल्क आकारून नियमित करण्याबाबत कार्यवाही करण्यासही मान्यता देण्यात आली. प्रस्तावित धोरणानुसार ३१ डिसेंबर २०१५ पूर्वी झालेली अनधिकृत बांधकामे सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांनुसार नियमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. नियोजन प्राधिकरणाने या तारखेपूर्वी झालेल्या अनधिकृत बांधकामांची सॅटेलाईट इमेजेस व इतर आवश्यक कागदपत्रांनुसार खात्री करून निर्यण घेणे आवश्यक आहे. शासनाने नियमितीकरणाची अधिसूचना, सूचना किंवा निर्देश प्रसिद्ध केल्यानंतर तीन महिन्यांत अशा अनधिकृत बांधकामधारकांनी संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे नियमितीकरणासाठी अर्ज दाखल करणे आवश्यक राहील. मंजूर बांधकाम नकाशा असल्याशिवाय मिळकतीच्या व्यवहारांची नोंद करता येणार नाही. तसेच ज्या व्यक्तींनी अनधिकृत बांधकाम करून विकले असेल त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्राद्वारे सादर केलेल्या प्रारूप शिफारशी, धोरण किंवा निकष स्वीकारण्यास व त्यानुषंगाने संबंधित अधिनियमातील योग्य त्या तरतुदींनुसार सर्व नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १५४ सह कलम १४३ नुसार निर्देश देण्यासंबंधी कार्यवाही करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. याप्रमाणे उच्च न्यायालयात सुरू असलेल्या जनहित याचिकेप्रकरणी शासनाचे हे धोरण सादर करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

----o----

दि. १० मार्च २०१६
सार्वजनिक आरोग्य विभाग

नागपूर मंडळांतर्गत आरोग्य सेवेतील

**क्ष किरण, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय**

आरोग्य सेवा नागपूर मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या १५ क्ष किरण तंत्रज्ञ आणि १३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या सेवा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून नियमित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळांतर्गत क्ष- किरण तंत्रज्ञ आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदासाठी प्रादेशिक निवड मंडळाकडून उमेदवार उपलब्ध न झाल्याने विहित अर्हता प्राप्त केलेल्या १६ क्ष किरण तंत्रज्ञ आणि १३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना सेवायोजन कार्यालयामार्फत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. यातील एक क्ष किरण तंत्रज्ञ सेवानिवृत्त झाल्यामुळे उर्वरित २८ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नियमित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सामान्य प्रशासन विभागाकडून ८ मार्च १९९९ ला विविध मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या ऐकवेळची बाब म्हणून नियमित करण्यात आल्या होत्या. त्यावेळी आरोग्य सेवा नागपूर मंडळांतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांबाबतचा प्रस्तावच अंतर्भूत करण्यात आला नव्हता. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

दि. १७ मार्च २०१६
कृषी विभाग

## पारंपरिक देशी बीजांच्या संवर्धन व जतनासाठी जीन बँकेच्या बळकटीकरणाचा निर्णय

राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरील जैव विविधतेचे संवर्धन करण्यासाठी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील जीन बँकेचे बळकटीकरण करून जनुकांच्या जतनासाठी येणाऱ्या १० कोटी इतक्या खर्चास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

हवामानातील नैसर्गिक बदलांमुळे विविध गुणधर्म असलेल्या पारंपरिक देशी वाणांचे झपाट्याने निर्मूलन होत आहे. हवामानाच्या बदलांतील जैविक तसेच अजैविक ताणांमुळे पारंपरिक प्रजातींमध्ये अनुवंषिक बदल होत आहेत. त्यामुळे या पारंपरिक देशी वाणांचे बियाणे संग्रहित करून त्यांचे कमी खर्चामध्ये संवर्धन व पृथ:क्करण करण्यासह त्यांच्या अनुवंषिक गुणधर्मांचे जतन करण्यासाठी जीन बँकेचे बळकटीकरण करणे आवश्यक होते. जीन बँकेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या अद्ययावत प्रयोगशाळा, शीतगृहे, भांडार, हरितगृहे, काचगृहे इत्यादी सुविधा निर्माण करण्यासह बँकेसाठी लागणारे मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जीन बँकेच्या बळकटीकरण करण्याच्या उद्दिष्टामध्ये प्रत्येक पिकाच्या जनुकाचे गुणवत्तेनुसार वर्गीकरण करणे, वर्गीकरणाच्या आधारे विविध पिकांचा दर्जा व उत्पन्नात वाढ करणे, हवामान बदलात अधिक उत्पन्न देणाऱ्या जाती विकसित करणे, आम्ल व क्षारयुक्त जमिनीत तग धरणाऱ्या तसेच किड व रोग प्रतिकारक्षम असणारी जनुके शोधणे, स्थानिक वाणांमध्ये बदल घडवून जैवतंत्रज्ञानाद्वारे अधिक उत्पादन देणारे वाण जलदगतीने विकसित करणे आणि पृथ:क्करण किंवा वर्गीकरण केलेले वाण राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांतील संशोधक व शास्त्रज्ञ यांच्यामार्फत शेतकऱ्यांना गरजेनुसार व वेळेत उपलब्ध करून कृषी विकासाला चालना देणे यांचा समावेश आहे.

-----०-----

दि. १७ मार्च २०१६

गृहनिर्माण विभाग

## बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास नवीन कार्यप्रणालीनुसार करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

तत्कालीन मुंबई विकास विभागाने (बी.डी.डी.) औद्योगिक कामगारांच्या निवासासाठी मुंबईतील वरळी, नायगाव, ना.म. जोशी मार्ग आणि शिवडी येथे बांधलेल्या चाळी खूप जुन्या झाल्याने त्यांचा पुनर्विकास नवीन कार्यप्रणालीनुसार करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत तत्कालीन मंत्रिमंडळाने १९९९ मध्ये २४ जुलै, २१ सप्टेंबर आणि ४ ऑक्टोबर रोजी घेतलेल्या बैठकीतील सर्व निर्णय रद्द करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे. बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये स्वतंत्र विनियम अंतर्भूत करण्यात येणार असून त्यामध्ये बी.डी.डी. चाळीतील पात्र भाडेकरूंना पुनर्विकासानंतर देण्यात येणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रफळ, बी.डी.डी. चाळी परिसरातील मोकळ्या जागांवर असलेली झोपडपट्टीसदृश्य बांधकामे, स्टॉल्स किंवा दुकाने, सामाजिक, शैक्षणिक आणि वाणिज्यिक संस्था यांचे पुनर्वसन इत्यादींसंदर्भात आवश्यक तरतुदी करण्यात येणार आहेत.

पुनर्विकास प्रकल्प योग्यरितीने राबविण्याच्या दृष्टीने म्हाडास मार्गदर्शन करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. तसेच या प्रकल्पासाठी सुकाणू अभिकरण (नोडल एजन्सी) म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई (म्हाडा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शक्ती प्रदत्त समिती आणि सुकाणू अभिकरण यांच्या कार्यकक्षांची देखील निश्चिती झाली आहे. वरळी, नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथील चाळींची जागा म्हडाच्या नावे नाममात्र दराने वर्ग करण्यात येणार आहे. शिवडी येथील चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने या चाळींच्या पुनर्विकास प्रस्तावास केंद्र शासनाकडून सहमती प्राप्त झाल्यानंतर त्यांचा समावेश पुनर्विकास प्रक्रियेमध्ये करण्यात येणार आहे.

काही शासकीय विभागांना बीडीडी चाळीतील वेगवेगळ्या इमारतींमध्ये सेवानिवासस्थाने म्हणून भाडेदारीने सदनिका देण्यात आलेल्या आहेत. या चाळींच्या पुनर्विकासानंतर संबंधित शासकीय विभागांना पूर्वीइतक्याच पुनर्वसन सदनिका उपलब्ध करून देण्यात येतील. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) यांना सक्षम प्राधिकारी तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून अधिसूचित करण्यात येईल. या चाळीतील धार्मिक स्थळांबाबत गृह विभागाने संबंधित शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही केल्यानंतर पुनर्विकास प्रस्तावामध्ये नियमित धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात येईल. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासानंतर प्राप्त होणाऱ्या निव्वळ नफ्याचे वाटप राज्य शासन व म्हाडा यांच्यामध्ये ७०:३० या प्रमाणात करण्यात येईल. या प्रकल्पासाठी अभिन्यास मंजुरी, इमारत आराखडे मंजुरी आणि बांधकाम परवाना प्रदान करण्याचे अधिकार म्हाडास देण्यात आले आहेत.

-----०-----

दि. १७ मार्च २०१६

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती

**व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीची योजना**

**२०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय**

राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शासकीय तसेच अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्त्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुधारित अटी व शर्तींनुसार सुरू ठेवण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सामाजिक मागास व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी सामाजिक बांधिलकीसह घटनात्मक उत्तरदायित्वाच्या भावनेने या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ही योजना पुढे सुरू ठेवताना दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणूनही या योजनेस मान्यता देण्यात आली.

आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येणार असून त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया (CAP), -एआयईईईच्या कोट्यातील महाराष्ट्रातील उमेदवार आणि खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ यामधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू राहणार आहे.

-----०-----

दि. १७ मार्च २०१६
विधी व न्याय विभाग

**राज्यातील १०० जलदगती न्यायालयांना**
**३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ**

प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालयांची आवश्यकता व उपयोगिता विचारात घेता राज्यातील १०० जलदगती न्यायालयांना १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०२१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

जलदगती न्यायालयांमध्ये प्रामुख्याने मागासवर्गीयांवरील अत्याचार, महिला अत्याचार, भ्रष्टाचार, मोटर अपघात दाव्यांची भरपाई, न्यायालयीन बंदी आणि भू-संपादन आदी प्रकरणे चालविली जातात. सद्यस्थितीत जलदगती न्यायालये कार्यान्वित असणे गरजेचे असल्याने त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक होते. या न्यायालयांना आवश्यक असणाऱ्या तदर्थ जिल्हा न्यायाधीश आणि त्यांच्या सहाय्यभूत कर्मचारी वर्गासह एकूण ५०० अस्थायी पदे ३१ मार्च २०२१ पर्यंत चालू ठेवण्यासही मंजुरी देण्यात आली. यासाठी येणाऱ्या ४३ कोटी ५१ लाख ९१ हजार एवढ्या वेतन, आवर्ती आणि अनावर्ती खर्चास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

दि. १८ मार्च २०१६
वित्त विभाग

**राज्याच्या २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पावरील भाषण**
**विधिमंडळात सादर करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता**

राज्याच्या २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पावरील वित्त मंत्री यांचे भाषण विधिमंडळात सादर करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०----

दि. २३ मार्च २०१६

विधी व न्याय विभाग

महाअधिवक्ता पदाचा अतिरिक्त कार्यभार रोहीत देव यांच्याकडे देण्यास मान्यता

**श्रीहरी अणे यांचा महाअधिवक्ता या पदाचा राजीनामा स्वीकृत**

राज्याच्या महाअधिवक्ता पदाचा श्रीहरी अणे यांनी दिलेला राजीनामा स्वीकृत करून त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार रोहीत देव यांच्याकडे सुपूर्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. तसेच श्रीहरी अणे यांचा राजीनामा स्वीकृत करण्याची शिफारस राज्यपालांना करण्यात येणार आहे.

महाअधिवक्ता हे राज्याचे सर्वोच्च विधी विषयक सल्लागार असल्याने या घटनात्मक पदावर तात्काळ नियुक्ती होणे किंवा नियमित नियुक्तीस काहीसा कालावधी लागणार असल्यास सक्षम विधिज्ञाकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात एक अंतरिम व्यवस्था म्हणून सोपविणे आवश्यक होते. त्यानुसार सहयोगी महाअधिवक्ता रोहीत देव यांच्याकडे राज्याच्या महाअधिवक्ता या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

-----o-----

दि. ३१ मार्च २०१६

सामान्य प्रशासन विभाग

खुल्या प्रवर्गासाठी ३८, तर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ होणार

**शासन सेवेतील प्रवेशासाठीच्या कमाल वयोमर्यादेत ५ वर्षाने वाढ**

राज्य शासन, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या निवड समित्यांमार्फत शासन सेवा प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदासाठीच्या स्पर्धा परीक्षांच्या कमाल वयोमर्यादेत ५ वर्षाने वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयामुळे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी सध्या असलेली कमाल वयोमर्यादा ३३ वरून ३८ वर्षे होणार असून मागासवर्गीय उमेदवारांसाठी सध्याची ३८ वर्षांची वयोमर्यादा आता ४३ वर्षे होणार आहे. याशिवाय सध्याच्या ज्या प्रवर्ग किंवा घटकांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात येणार नाही.

-----o-----

दि. ३१ मार्च २०१६

वन विभाग

## हरित भारत अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय

वैश्विक उष्णतेत होणाऱ्या वाढीबरोबरच हवामान व ऋतु बदलाची तीव्रता आणि परिणामकारकता कमी करण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या हरित भारत अभियानाची राज्यात अंमबलजावणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

या महत्त्वपूर्ण अभियानांतर्गत संस्थात्मक नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ग्राम, शहर, जिल्हा आणि राज्यस्तरावरील संस्थांचा सहभाग घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यामध्ये अभियानाची अंमलबजावणी होण्यासाठी या स्तरांवर समित्यांचे गठण करून त्यांच्या कार्यकक्षा निश्चित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य शासन यांच्या अनुक्रमे ६० टक्के आणि ४० टक्के या आर्थिक सहभागानुसार हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानामध्ये अनेक बाबींचा समावेश आहे. वन आणि वनेतर उपलब्ध क्षेत्रांमध्ये वृक्ष लागवड करुन वनक्षेत्र आणि वृक्षांचे आवरण अधिक वाढविणे, ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविणे आणि कृषीक्षेत्रामध्ये वनीकरणाद्वारे (Agro-Forestry) विकास करुन त्यातून शेतकरी व जमीन मालक यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा उद्देश आहे. यामध्ये पाणथळ जमिनीचा विकास करण्याचादेखील समावेश आहे.

-----o-----

दि. ३१ मार्च २०१६

ग्रामीण विकास विभाग

<u>जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील राखीव जागांचे प्रकरण</u>

## निवडून आल्यापासून सहा महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मंजुरी

जात पडताळणी समित्यांकडील कामाच्या प्रचंड प्रमाणामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमधील राखीव जागा लढवू इच्छिणाऱ्या व्यक्ती जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी निवडणूक लढविण्यापासून वंचित राहू नयेत यासाठी निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १२(अ), ४२(६-अ), ६७(७-अ) मध्ये सुधारणा करण्याच्यादृष्टीने विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात विधेयक मांडण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याचा शेवटचा दिनांक ३१ डिसेंबर २०१७ किंवा त्यापूर्वीचा असलेल्या निवडणुकांसाठीच हा निर्णय लागू होणार आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकाचा मागास प्रवर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागेसाठी तसेच अध्यक्ष किंवा सभापती पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी अर्ज केला असल्यास त्याची सत्यप्रत किंवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी जोडणे आवश्यक आहे. तसेच निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र, निवडूण आल्यानंतर सहा महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्या व्यक्तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येणार असून ती सदस्य राहण्यास निरर्ह ठरणार आहे.

-----०-----

दि. ३१ मार्च २०१६
ऊर्जा विभाग

## महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वित्तीय पुनर्रचना योजनेस मान्यता

महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचनेतील दुसऱ्या टप्प्यातील वित्तीय पुनर्रचना योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना काढण्यात येणार असून कोणत्याही मत्ता किंवा दायित्वासंबंधी केल्या जाणाऱ्या दुरुस्त्या किंवा मेळ यांच्या नोंदीच्या अधीन राहण्याचे अधिकार ऊर्जा विभागास देण्यात आले आहेत. तसेच शासनाने नियुक्त केलेल्या सल्लागाराने वित्तीय वर्ष २००६ च्या बाजारभावानुसार मूल्यांकन केल्यानुसार वाढलेल्या मत्तांच्या मूल्यामुळे होणारे परिणाम चारही कंपन्यांच्या विवरणपत्रात दर्शविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्थिर मत्तांच्या वाढलेल्या मूल्यांकनाप्रमाणे सममूल्य समभाग, प्रलंबित भाग अर्ज निधी आणि ताब्यात घेणार असलेल्या दायित्वांसाठी समभाग शासनास वितरित करण्यात येतील. यासाठी चारही विद्युत कंपन्यांच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा वाढविण्यात येईल.

समभाग जारी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास संघटनेचा लेख आणि अधिसंघ संस्थापना लेख यामध्ये बदल करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. तसेच आवश्यकता असल्यास भाग प्रमाणपत्र किंवा गरजेचे दस्तऐवज शासनाचे विभाग आणि केंद्र शासनाचे सांधिक व्यवहार मंत्रालय येथे देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

-----o----

दि. ३१ मार्च २०१६
वस्त्रोद्योग विभाग

वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ मध्ये सुधारणा

**वस्त्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदानाऐवजी**
**भांडवली अनुदान देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय**

प्रशासकीय सुलभीकरणाच्या दृष्टीने वस्त्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

वस्त्रोद्योग प्रकल्पांना वस्त्रोद्योगाच्या प्रकारानुसार व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान देण्यात येणार आहे. सुतगिरणी, गारमेंटिंग, जिनिंग-प्रेसिंग व प्रोसेसिंग या वस्त्रोद्योग घटकांना टीयुएफएस (TUFS) असंलग्न योजनेतील व्याज दर ७ टक्के असताना कापूस उत्पादक क्षेत्राबाहेरील प्रकल्पांसाठी भांडवली अनुदानाचा दर पात्र रकमेच्या ३५ टक्के राहणार आहे. टेक्निकल टेक्सटाईल्स, कंपोझिट युनिट या वस्त्रोद्योग घटकांसाठी टीयुएफएस (TUFS) असंलग्न योजनेतील व्याज दर ६ टक्के असताना कापूस उत्पादक क्षेत्राबाहेरील प्रकल्पांसाठी भांडवली अनुदानाचा दर पात्र रकमेच्या ३० टक्के राहणार आहे. तसेच अन्य वस्त्रोद्योग घटकांसाठी टीयुएफएस (TUFS) असंलग्न योजनेतील व्याज दर ५ टक्के असताना कापूस उत्पादक क्षेत्राबाहेरील प्रकल्पांसाठी भांडवली अनुदानाचा दर पात्र रकमेच्या २५ टक्के राहणार आहे. विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्रातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना अतिरिक्त १० टक्के भांडवली अनुदान देण्याची सध्याची योजना कायम राहणार आहे.

या निर्णयानुसार शासन आदेश काढण्यात आल्यानंतर टीयुएफएस (TUFS) च्या निकषानुसार बँकांनी दीर्घ मुदत कर्ज मंजूर केलेले वस्त्रोद्योग प्रकल्प व्याज सवलती ऐवजी भांडवली सवलतीस पात्र राहतील. विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील प्रकल्पांना भांडवली अनुदान देण्यासाठी वस्त्रोद्योग प्रकल्पाचे मूल्यांकन, प्रकल्प मंजूर करण्याची कार्यपद्धती, प्रकल्प मंजुरीसाठी तांत्रिक निकष, ऑनलाईन सनियंत्रण यासाठी प्रचलित पद्धत किंवा नियमावलीचा अवलंब करण्यात येतो. वस्त्रोद्योगांना व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान देण्यासाठी याच पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्रातील वस्त्रोद्योग प्रकल्प पूर्ण होऊन तो उत्पादनाखाली आल्यानंतर त्यांना एकूण देय अनुदानाच्या १५ टक्के एवढा भांडवली अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात येईल. तसेच वस्त्रोद्योग संचालकांनी प्रकल्प पुढे चालू असल्याबाबतचे दरवर्षी प्रमाणित केल्यानंतर उर्वरित अनुदान पुढील सहा समान हप्त्यात देण्यात येईल. त्याचप्रमाणे विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्राबाहेरील वस्त्रोद्योग प्रकल्प पूर्ण होऊन तो उत्पादनाखाली आल्यानंतर भांडवली अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात येईल आणि वस्त्रोद्योग संचालकांनी प्रकल्प पुढे चालू असल्याबाबतचे दरवर्षी प्रमाणित केल्यानंतर उर्वरित अनुदान पुढील सहा समान हप्त्यात देण्यात येईल.

----०----

दि. ३१ मार्च २०१६
नियोजन विभाग

उपग्रह छायाचित्र खरेदी व भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर

**महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्रास**
**प्रमुख संस्था म्हणून घोषित करण्याचा निर्णय**

राज्यासाठी सामायिक -महाराष्ट्र डिजिटल भौगोलिक माहिती संच प्रणाली॰ (Maharashtra Geo-spatial Digital Database Systerm-MGDDS) विकसित करण्यासह त्याची अंमलबजावणी व देखभाल करण्यासाठी नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्राला (MRSAC) प्रमुख संस्था (Nodal Agency) म्हणून घोषित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यापुढे कोणत्याही प्रशासकीय विभागाला अथवा सार्वजनिक उपक्रमांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना उपग्रहीय भौगोलिक माहिती संच स्वतंत्रपणे खरेदी करता येणार नाहीत. तर शासनासाठी -एमआरएसएसी॰मार्फत माहिती खरेदी करून विविध विभागांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी अनावर्ती अंदाजे ३०६ कोटी व आवर्ती ५० कोटी इतक्या खर्चाची तरतूद करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

या केंद्रातर्फे राज्यासाठी वेळोवेळी आवश्यक असलेली उपग्रह छायाचित्रे महाराष्ट्र शासनाच्या वतीने विकत घेण्यासह त्यावर आवश्यक ती प्रक्रिया करून शासनाच्या विविध विभागांना वापरासाठी एमजीडीडीएस मार्फत उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच सर्व विभागांना आवश्यक असलेली भौगोलिक माहिती स्टँडर्ड डेटा फॉरमॅट किंवा टेंम्प्लेट मध्ये गोळा करण्यासाठी सर्व विभागांना तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करण्यात येईल. सुदूर संवेदन, भौगोलिक माहिती प्रणाली, जीपीएस आणि एलआयडीएआर अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण, शहर, कृषी, वने, खनिज, रस्ते, पाणी इत्यादी साधनसंपत्तींच्या विकास योजनांची आखणी, अंमलबजावणी आणि नियंत्रण करण्यात येईल. तसेच नैसर्गिक विपदांमध्येही अशी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

------o------

दि. ०६-०४-२०१६

सहकार विभाग

<u>सॉफ्ट लोन योजनेचा लाभ मिळू न शकलेले कारखाने</u>

**शेतकऱ्यांना एफआरपीची उर्वरित रक्कम देण्यासाठी**

**यापूर्वीच्या योजनांस मुदतवाढ देण्याचा निर्णय**

शासनाने जाहीर केलेल्या सॉफ्ट लोन योजनेचा लाभ मिळू न शकलेल्या कारखान्यांस तसेच कच्च्या साखरेचे उत्पादन केलेल्या कारखान्यास ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना एफआरपीची उर्वरित रक्कम देण्यासाठी यापूर्वीच्या संबंधित योजनांस मुदतवाढ देण्यासह एफआरपीची रक्कम अदा केल्यानंतर कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर वर्ग करण्यास मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

विहित मुदतीत सॉफ्ट लोन मंजूर व वितरण न झालेल्यांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असून एकूण १७६ साखर कारखान्यांसाठी लागू केलेल्या सॉफ्टलोन योजनेंतर्गत कर्ज मंजुरी व वितरणाची मुदत ३१ मे २०१६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या तीन सॉफ्टलोन योजना केवळ शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम देण्यासाठी लागू करण्यात आल्या आहेत. तसेच साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या कच्च्या साखर उत्पादनांचाही कर्ज पात्र मर्यादा ठरविण्यासाठी विचार केलेला आहे. आता, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा केल्यानंतर कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार मंजूर कर्ज पात्र मर्यादा रक्कम आणि वित्तीय भाराच्या मर्यादेतच या मान्यता देण्यात आल्या आहेत.

------०------

दि. ०६ एप्रिल २०१६
पाणी पुरवठा विभाग

**पाणी पुरवठ्यासाठी राज्याच्या स्वतंत्र**
**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमास मान्यता**

ग्रामीण भागातील दीर्घकालीन गरजांचा विचार करून तेथील जनतेला पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी २०१६ ते २०२० या कालावधीत राज्याचा स्वत:चा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात केंद्र तसेच राज्य शासनाच्या मागणी आधारित धोरणांतर्गत अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. राज्यात प्रगतीपथावर असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यास केंद्र शासनाने प्राधान्य देण्याचे सूचित केले आहे. तथापि, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून नवीन योजनांसाठी केंद्र शासनाने तूर्तास बंद केलेले निधी वितरण आणि राज्याचे केंद्र शासनावर असलेले अवलंबित्व या बाबींचा विचार करता पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या पुरवठ्यासाठी राज्याचा स्वत:चा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळेच ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याची गरज भागविण्यासह पिण्याच्या पाण्यासंदर्भातील सर्व प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी “मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम” स्वतंत्ररित्या राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामीण भागामध्ये हा कार्यक्रम आवश्यकतेनुसार राबविण्यात येणार असून त्यावर पुढील चार वर्षात २५०० कोटी रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील दुष्काळजन्य परिस्थिती हाताळण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रामुख्याने तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरूज्जीवन आणि प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरूस्ती यांचा समावेश आहे.

-----०-----

दि. ११ एप्रिल २०१६
नगर विकास विभाग

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकास

## प्रारूप निविदा टप्प्यातील दस्तऐवज व करारनाम्यांना मंजुरी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाशी संबंधित प्रारूप बोली टप्प्यातील दस्तावेज आणि करारनाम्यांना मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यानुसार केंद्रीय गृह मंत्रालयाने सुरक्षाविषयक मान्यता (Security Clearence) दिलेल्या अर्जदारांनाच निविदा टप्प्यात समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावरील विमानतळाच्या विकासाशी संबंधित प्रस्तावित निविदा प्रारुप टप्प्यातील आवश्यक दस्तावेजांना तत्त्वत: मान्यता देण्यात आली असून राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार केवळ जमीन हस्तांतरणाच्या पहिल्या दस्तांनाच मुद्रांक शुल्कातून सूट देण्यात येणार आहे.

विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) मध्ये सिडकोचे २६ टक्के हिश्श्याचे समभाग असतील. तथापि, निविदा वाटप पत्राच्या दिनांकानंतर पुढील ५ वर्षांपर्यंत भारतीय विमानतळ प्राधिकरणास सिडकोच्या २६ टक्के समभागापैकी ५ टक्के समभाग ठेवण्यास आणि विशेष उद्देश वाहनाच्या संचालक मंडळावर एक प्रतिनिधी नियुक्त करण्याचा पर्याय खुला ठेवण्यास मान्यता देण्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या सहभागासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

विमानतळाच्या विकासासाठी पूर्व निविदा बैठका व नागरी हवाई उड्डाण मंत्रालय यांच्याकडून मंजुरी घेताना कोणतेही किरकोळ बदल करावे लागल्यास ते बदल करण्याचे अधिकार प्रकल्प नियंत्रण व अंमलबजावणी समितीला देण्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाने मान्यता दिल्यानुसार विमानतळ विकासाचे काम यशस्वी बोलीदारांना प्रदान करण्यासाठी राज्य शासनास शिफारस करण्याचे अधिकार देखील या समितीला देण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी संपादित होणाऱ्या जमिनीच्या भूधारकांना व या प्रकल्पामुळे विस्थापित होऊन स्थलांतरित होणाऱ्या बांधकामधारकांना द्यावयाच्या विकसित भूखंडाचे बाजारमूल्य एक रुपया गृहित धरून मुद्रांक शुल्क आकरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

दि. ११ एप्रिल २०१६
नगर विकास विभाग

मुंबईतील जुन्या व मोडकळीस इमारतींचे प्रकरण

**ठराविक कालावधीत पुनर्बांधणीच्या हमीसाठी**
**अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय**

मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती महानगरपालिकेमार्फत पाडण्यात आल्यानंतर इमारतींमधील भाडेकरूंना ठराविक कालावधीत इमारतीच्या पुनर्बांधणीची हमी मिळण्यासह त्यांच्या अधिकारांचे संरक्षण होण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ व त्यानुषंगाने कलम ४९९ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यानुसार महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ मध्ये उपकलम (३) ते (५) आणि कलम ४९९ मध्ये उपकलमे (३) ते (६) तसेच नवीन परंतुक व स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येणार आहे. तसेच यासंदर्भात पुढील तपशील ठरविण्यासाठी गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.

------०-----

दि. ११ एप्रिल २०१६
सामान्य प्रशासन विभाग (संसदीय कार्य)

पावसाळी अधिवेशन १८ जुलै रोजी सुरू होणार

**विधानमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन**
**१३ एप्रिल रोजी संस्थगितीच्या शिफारसीचा निर्णय**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सध्या सुरू असलेले अधिवेशन बुधवार, दि. १३ एप्रिल २०१६ रोजी दोन्ही सभागृहातील कामकाज संपल्यानंतर संस्थगितीची शिफारस राज्यपालांना करण्यास मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे विधानमंडळाचे आगामी म्हणजेच सन २०१६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दि. १८ जुलै २०१६ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्याचीही शिफारस राज्यपालांना करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----